## नियमित दिवाणी दावा क्र.५६/२०२१ निशाणी क्र.०५ खालील आदेश
## (**CNR No.MHNS160008812021**)

०१. प्रस्तुतच्या अर्जान्वये वादी यांनी दाव्याचा अंतिम निकालापावेतो प्रतिवादी क्र.१ व २ यांनी अथवा कुटुंबातील कुणीही व्यक्तीने अथवा प्रतिवादीचे नोकर, चाकर, मजुर, एजंट यांनी वादीस त्यांचे मालकीचे गट क्र.५१ व ५२ या वाद मिळकतीत जाण्या–येण्यास प्रतिवादी यांनी त्यांचे गट क्र.५४ व ५५ या मिळकतींचे बांधाचे दरम्यान असणारा पुर्व–पश्चिम रस्त्यावरुन शेतीमाल व जनावरे यांची ने आण करण्यास हरकत अडथळा निर्माण करु नये तसेच वादीचे वाद मिळकतीचे मालकी व कब्जे उपभोगास बाधा येईल तसेच वादीचे ग्रामपंचायत मिळकत नं.२२० चे नुकसान होईल असे कोणतेही विघातक कृत्य करु नये असा तुर्तातुर्त मनाई हुकूमाचा आदेश होण्यास विनंती केली आहे. तसेच, वादींनी दाव्याची संपुर्ण हकीकत प्रस्तुत अर्जामध्ये सविस्तरपणे नमुद केलेली आहे.

०२. प्रतिवादी क्र.१ यांनी नि.क्र.२० व प्रतिवादी क्र.२ यांनी नि.क्र.२२ येथे त्यांची प्रस्तुत अर्जास जबाब व कैफियत दाखल करुन सविस्तर कथन करुन वादीची संपुर्ण कथने नाकारली आहेत.

०३. दोन्ही बाजुंचा युक्तिवाद श्रवण केला.

०४. वादीची कथने व दप्तरी दाखल असलेल्या दस्तऐवजांवरुन खालील मुद्ये विचारार्थ आले, त्यावर पुढील कारणमिमांसेसह विवेचन करीत आहे.

| अ.क्र. | मुद्ये | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | वादी असे सिध्द करतात काय की, त्यांना प्रथमदर्शनी वाद आहे ? | होकारार्थी. |

| | | |
|---|---|---|
| २. | वादी असे सिध्द करतात काय की, सोईचे संतुलन त्यांच्या हक्कात आहे ? | होकारार्थी. |
| ३. | वादी असे सिध्द करतात काय की, अर्ज नामंजूर झाल्यास त्यांचे अनिरसनीय असे नुकसान होईल? | होकारार्थी. |
| ४. | काय आदेश ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

## :: <u>का र ण मि मां सा</u> ::

**<u>मुद्दे क्र.१ ते ३</u> :-**

०५. मुद्या क्र.१ ते ३ हे एकमेकांशी निगडीत असल्याने पुनरावृत्ती टाळण्यासाठी सर्व मुद्दे एकत्रीत चर्चेसाठी घेतले आहेत. तसेच, वादी व प्रतिवादी यांच्या दाव्यातील व कैफियतमधील कथनांची पुनरावृत्ती टाळण्यासाठी आवश्यक तेवढीच कथने कथीत केली आहेत.

०६. प्रस्तुतचा दावा हा जाहीर ठराव करुन मिळण्यासाठी तसेच निरंतर ताकीद व हूकूमात्मक विनंतीसाठी दाखल केलेला आहे. तसेच, वादी यांनी प्रस्तुत अर्जामध्ये दाव्यामध्ये कथन केल्याप्रमाणे प्रतिवादी यांनी स्वतः अथवा कुटुंबातील कोणीही व्यक्तींनी अथवा तर्फे कोणीही व्यक्तींनी वादींच्या मालकीच्या मिळकतीस जाण्या येण्याच्या मार्गास कोणत्याही प्रकारे हरकत अडथळा करु नये याबाबतीतली तुर्तातुर्त मनाई मिळण्याची विनंती केली आहे. वादी यांच्या कथनाप्रमाणे दावा मिळकत 'अ' त्यांच्या मालकीच्या व कब्जेवहिवाटीच्या मिळकती आहेत व तसेच दावा मिळकत 'ब' प्रतिवादी क्र.२ यांच्या मालकीची मिळकत आहे. वादी यांनी

दाव्यासोबत वाद समजुतीसाठी कच्चा नकाशा सोबत दाखल केलेला आहे. वादी यांच्या कथनाप्रमाणे दावा मिळकत गट क्र.५१ व ५२ मध्ये वादींना जाण्या–येण्यासाठी प्रतिवादी क्र.१ यांचे गट क्र.५४ व प्रतिवादी क्र.२ यांचे गट क्र.५५ या शेतमिळकती लगत असलेल्या पुर्व–पश्चिम दिशेच्या रस्त्याचा वापर करावा लागत आहे. त्याअनुषंगाने वादी यांनी अभिलेखावर कागदोपत्री पुरावा दाखल केलेला आहे.

०७. वादी यांच्या कथनाप्रमाणे सदरच्या रस्त्याच्या वहिवाटीबाबतचा निकाल वादी यांच्या बाजुने लागलेला आहे. त्याअनुषंगाने वादी यांनी अभिलेखावर नि.क्र.२४ सोबत अ.क्र.१ व वहिवाट केस क्र.१८/२००९ याची साक्षांकीत प्रत दाखल केलेली आहे. सदर निकालाच्या प्रतीचे अवलोकन केले असता, असे सकृतदर्शनी स्पष्ट होते की, वादी दशरथ गांगुर्डे यांनी सदरचे प्रकरण संबंधीत तहसिलदार यांचे समोर मामलतदार कोर्ट अधिनियमाचे कलम ५ अन्वये सदर रस्त्याच्या वहिवाटीच्या वादासंदर्भात दाखल केले होते. त्याचा निकाल दि.११.०२.२००९ रोजी पारीत झालेला असुन त्यातील विषय हा रस्त्याबाबत होता. सदर निकालामध्ये असे स्पष्ट केले आहे की, वादी यांना वहिवाटीस दुसरा रस्ता नाही व त्यांना सर्वे नं.५४ व ५५ च्या सामाईक बांधाने शेती अवजारे, गुरे व बैलगाडी नेण्यासाठी पुर्वापार असलेली वहिवाट रस्ता खुला करुन देण्यात येत आहे व प्रस्तुत दाव्यातील प्रतिवादी क्र.१ यांनी वादी यांना हरकत अडथळा त्याबाबतीत करु नये व तसेच वादी यांना त्यांच्या कडुन कोणतेही नुकसान होणार नाही याबाबतचा आदेश पारीत आहे. सदर बाबतीत वादी यांनी अभिलेखावर जो कागदोपत्री पुरावा दाखल केलेला आहे त्यावरुन असे सकृतदर्शनी स्पष्ट होते की, सदर तहसिलदार यांचे

निकालासंदर्भात फेरफार नोंद क्र.१०४१ अन्वये फेरफार नोंदवहीत सदर निकालाची नोंद झालेली आहे.

०८. उलटपक्षी, प्रतिवादी यांचे असे कथन आहे की, सदर फेरफार क्र.१०४१ बाबत प्रतिवादी क्र.२ यांना कोणतीही माहिती नव्हती. तसेच, प्रतिवादी क्र.२ यांचे मयत सासरे नारायण अहिलाजी सुर्यवंशी हे पक्षकार नव्हते. तसेच, सदर बाबतीतील नोटीसही त्यांना बजावलेली नाही. त्यामुळे, सदर बाबतचा निर्णय त्यांच्या विरुध्द पारीत करता येणार नाही. प्रतिवादी क्र.२ यांनी असे कथन केले आहे की, वादी यांच्याकडुन सदर प्रतिवादी यांनाही रस्त्याच्या वहिवाटीबाबत हरकत अडथळा झाला होता व त्याअनुषंगाने मामलतदार कोर्ट अधिनियम कलम ५ अन्वये रस्त्या बाबतचा वाद हा वहिवाट केस क्र.१/२००० अन्वये तहसिलदार यांच्यापुढे दाखल झाला होता व तसा निकाल दि.२७.०७.२००३ रोजी सदर प्रतिवादी यांचे सासरे नारायण सुर्यवंशी व इतर लोकांचे बाजुने पारीत झाला होता. वरील विषयास अनुसरुन प्रतिवादी क्र.२ यांनी अभिलेखावर त्याअनुषंगाने सकृतदर्शनी आवश्यक तो पुरावा दाखल केलेला नाही. त्यामुळे, सदयस्थितीतीला सदर प्रतिवादी यांची वरील प्रकरणाबाबतची कथने ग्राहय धरता येणार नाही.

०९. उलटपक्षी, प्रतिवादी क्र.१ यांनी वादी यांच्या दावा मिळकतीच्या मालकीबाबतचा वाद उपस्थित केलेला नाही. सदर प्रतिवादी यांनी प्रतिवादी क्र.२ यांच्या कैफियत व म्हणण्याप्रमाणे कथन केलेले आहे. तसेच, वादी यांनी अतिक्रमण करुन घरे बांधलेली आहेत असा वाद उपस्थित केलेला आहे. त्याबाबतीत वादी यांचे विधीज्ञांनी असा युक्तिवाद केला की, सदर अतिक्रमणाबाबत ग्रामपंचायतीने त्यांना

नोटीस पाठविली नाही. तसेच, त्याबाबतचा वाद गावतंटामुक्ती समितीकडे दाखल झालेला नाही. याठिकाणी, मी, वादी यांच्या कथनास सदयस्थितीला सहमत आहे. अतिक्रमणाचा विषय संबंधीत ग्रामपंचायतीने नोटीसीने समोर आणलेला नाही. त्यामुळे, सदरचा मुददा या ठिकाणी सदयस्थीतीला विचारात घेण्याची आवश्यकता नाही.

१०. प्रतिवादी यांनी वादी यांची दावा मिळकत क्रमांक 'अ' बाबतची मालकी मान्य केलेली आहे. त्यामुळे, वादी यांचे मिळकतीबाबत अभिलेखावर वाद नाही. या ठिकाणी मुख्य जो वाद आहे तो रस्त्याच्या वहिवाटीबाबतचा वाद आहे आणि त्या अनुषंगाने सकृतदर्शनी पुरावा अभिलेखावर काय दाखल केला आहे ते पाहणे क्रमप्राप्त ठरते. वर कथन केल्याप्रमाणे व प्रतिवादींना मान्य असल्याप्रमाणे वादी यांना स्वतःच्या दावा मिळकतीमध्ये शेती कसण्यासाठी जाण्या–येण्याचे मार्गाचे रस्त्याचा वाद संबंधीत तहसिलदार यांनी मिटविलेला आहे. मात्र, त्यानंतर वादी व प्रतिवादी यांच्या मध्ये पुन्हा वाद निर्माण झालेला दिसतो व त्याअनुषंगाने संबंधीत पोलीस ठाण्यात तक्रारी दाखल झाल्याचे दिसतात. याठिकाणी प्रतिवादी यांचे विधीज्ञांनी असा युक्तिवाद केला की, वादी यांनी वहिवाट केस संबंधात तहसिलदार यांच्या आदेशाप्रमाणे रस्ता खुला करुन घेतला नव्हता व तसेच सदर प्रकरणास प्रतिवादी यांचे पुर्वज पक्षकार नव्हते. याठिकाणी असे स्पष्ट आहे की, सदरचा वाद हा तहसिलदार यांच्याकडे जरी मिटला असला तरी त्याबाबतच्या जाहीर ठरावाच्या व तद्अनुषंगाने इतर मागणी ही संबंधीत न्यायालयामार्फतच पुर्ण होवु शकते. त्यामुळे, सदरचा मुद्दा या ठिकाणी विचारात घेणे आवश्यक वाटत नाही. सर्वात विशेष बाब

म्हणजे अभिलेखावर प्रतिवादींनी त्यांची कथने सकृतदर्शनी शाबीत करण्यासाठी आवश्यक तो पुरावा दाखल केलेला नाही. त्यामुळे, वादी यांचा जो पुरावा दाखल आहे तोच सकृतदर्शनी विचारात घेणे न्यायोचीत आहे. त्यामुळे, अभिलेखाचे संपुर्ण अवलोकन करुन, माझे सकृतदर्शनी असे मत झालेले आहे की, वादीस सकृतदर्शनी खटला आहे. तसेच, न्यायाचा तराजु वादीच्या बाजुने झुकतो कारण रस्त्याच्या वहिवाटीचा हक्क वादींना जातो कारण त्यांच्या दावा मिळकतीस जाण्या–येण्यासाठी दुसरा रस्ता जर नसेल तर तो रस्ता प्रतिवादींच्या मिळकतीलगत कायदयाने देणे न्यायोचीत ठरते व त्यास कोणीही हरकत अडथळा करु शकत नाही. प्रतिवादी यांच्या कथनाप्रमाणे त्यांच्या वहिवाटीच्या अडथळायाबाबतचा विषय हा प्रस्तुत दाव्यामध्ये नंतर कागदोपत्री पुरावा पाहुन निकाली निघु शकतो. मात्र, सध्या संबंधीत रस्त्यास प्रतिवादींनी हरकत, अडथळा करु नये असा खटला वादीच्या बाजुने आहे. त्यामुळे, प्रस्तुतचा अर्ज नामंजुर झाल्यास वादींना स्वतःची शेती कसण्यास हरकत, अडथळा निर्माण होवु शकतो व त्यांचे नुकसान होवु शकते असे दिसते. तसेच, वादी यांची घर मिळकत क्र.२२० वादी यांची कथने सकृतदर्शनी त्यांनी दाखल केलेल्या पुराव्यावरुन प्रतिवादी यांच्याकडुन हरकत, अडथळा होवु नये यासाठी संरक्षण करणे न्यायोचीत वाटते. एकंदरीत, वरील विवेचनावरुन असे स्पष्ट होते की, वादीने त्यांच्या हक्कात प्रथमदर्शनी वाद असल्याचे व सोईचे संतुलन त्यांच्या बाजुने असल्याचे शाबीत केले आहे. करीता, मुद्दा क्र.१ ते ३ चे उत्तर होकारार्थी देण्यात येते.

**मुद्दा क्र. ४**:–

११. मुद्दे क्र.१ ते ३ च्या विवेचनावरुन वादींनी तात्पुरता मनाई हुकूम

मिळण्यासाठी आवश्यक असलेल्या सर्व बाबी सकृतदर्शनी सिध्द केल्या आहेत. परिणामी, वादी मागणीप्रमाणे तात्पुरत्या मनाई हुकूमाचा आदेश मिळण्यास पात्र आहे. करीता, मुद्दा क्रमांक ४ च्या निष्कषार्थ खालील आदेश पारीत करण्यात येत आहे:

**:: <u>आ दे श</u> ::**

१. निशाणी क्र.५ वरील अर्ज मंजुर करण्यात येत आहे.

२. या दाव्याचा अंतिम निकालापावेतो प्रतिवादी क्र.१ व २ यांनी अथवा कुटुंबातील कुणीही व्यक्तीने अथवा प्रतिवादीचे नोकर, चाकर, मजुर, एजंट यांनी वादीस त्यांचे मालकीचे गट क्र.५१ व ५२ या वाद मिळकतीत जाण्या–येण्यास प्रतिवादी यांनी त्यांचे गट क्र.५४ व ५५ या मिळकतींचे बांधाचे दरम्यान असणारा पुर्व–पश्चिम रस्त्यावरुन शेतीमाल व जनावरे यांची ने आण करण्यास हरकत अडथळा निर्माण करु नये तसेच वादीचे वाद मिळकतीचे मालकी व कब्जे उपभोगास बाधा येईल तसेच वादीचे ग्रामपंचायत मिळकत नं.२२० चे नुकसान होईल असे कोणतेही विघातक कृत्य करु नये असा तुर्तातुर्त मनाई हुकूम देण्यात येत आहे.

३. खर्चाबाबत आदेश नाही.

SUNIL BHIMRAO MANE

Digitally signed by SUNIL BHIMRAO MANE
Date: 2022.06.29 16:26:29 +0530

ठिकाण :– चांदवड.
दिनांक :– २९.०६.२०२२.

(सुनिल भि. माने)
सह दिवाणी न्यायाधीश, (क.स्तर),
चांदवड.